## नियमीत दरखास्त क्र. ५३/२०१७ मधील नि.१६१ खालील आदेश (जुना रे.द.नं.९/२०१६)

वि.प.नं. १–अ व १–ब यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ प्रमाणे कोर्ट कमिशनर यांचे नेमणूकीसाठी सादर केला आहे. वि.प.नं. १–अ, व ब यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी दरखास्तदार यांनी नि. ११७ प्रमाणे अर्ज देवून वि.प.क्रं.१–अ व ब यांचे काटेभोगाव, ता.पन्हाळा येथील भू.गट क्रं.३१० एकूण क्षेत्र ९ एकर २६ गुंठे पैकी दक्षिणेकडील ३ एकर १७ गुंठे क्षेत्रातील ऊस पीक जप्त करुन नुकसान भरपाई मिळणेची मागणी केलेली आहे. सदर भू.गट क्रं.३१० बाबत वरिष्ठ न्यायालयामध्ये प्रकरणे प्रलंबित आहे.

०२. सद्य परिस्थितीमध्ये ऊस कारखान्यांचा गाळप हंगाम संपत आलेला आहे. अशा परिस्थितीत ऊसाच्या पिकाचे लवकरात लवकर गाळप करणे आवश्यक आहे. नि. ११७ चे सुनावणीस दिनावधी लागणार आहे. त्यामुळे वर नमुद क्षेत्रामधील ऊसाचे पीक कोर्ट कमिशनर यांचे मार्फत कारखान्यास पाठवून सदरची रक्कम मे. कोर्टात जमा करणे योग्य व कायदेशीर होणार आहे. त्यामुळे वि.प. अथवा दरखास्तदार यांचे कोणतेही नुकसार होणार नाही. सबब, गट नं. ३१० मधील दक्षिणेकडील ३ एकर १७ गुंठे क्षेत्रातील ऊस पिकाची तोड कोर्ट कमिशनर यांचे

मार्फत व्हावी व सदर ऊस त्यांचे नांवे दालमिया शुगर्स  नांवे अगर इतर कोणत्याही साखर कारखान्यास पुरवठा करुन त्यातून येणारी रक्कम न्यायालयात जमा करणेचा आदेश कोर्ट कमिशनर यांना  व्हावा अशी विनंती वि.प.क्रं. १–अ व १–ब यांनी केली आहे.

०३. दरखास्तदार यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे सादर करुन न्यायाचे कारणास्तव आवश्यक तो आदेश करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वस्तुस्थितीप्रमाणे दरखास्तदार यांनी नि. क्रं. ११७ अन्वये अर्ज दाखल करुन वि.प. क्रं. १–अ व ब यांनी न्यायालयाचे आदेशाचा अवमान केला असल्याचे कथन करुन दरखास्तदार यांचे गट नं. ३१० मधील उत्तरेकडील कांही क्षेत्रामध्ये असलेले भात पिक दांडगाव्याने कापून नेले आहे व त्यामुळे गट नं. ३१० पैकी दक्षीणेकडील ३ एकर १७ गुंठे क्षेत्र जे वि.प.क्रं.१ अ व ब यांचे ताब्यात आहे त्यातील ऊस पिक जप्त करुन, न्यायालयामार्फत विक्री करुन सदरची रक्कम दरखास्तदार यांना देणेचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.  या सदंर्भातील दोन्ही पक्षकारांनी पटलावर कांही कादपत्रे सदार केली आहेत.  तथापि, सदरची कागदपत्रे त्यावरील दोन्ही बाजुच्या युक्तीवादावेळी विचारात घेणे आवश्यक आहे.  या क्षणी कोणत्याही कागदपत्रांचा उहापोह न करता किंवा त्यांचे गुणदोषावर कोणतेही भाष्य न करता संबंधित पक्षकारांचे कायदेशीर हक्क अबाधित राखून प्रस्तुत अर्ज निर्णयीत करणे आवश्यक आहे.  याठिकाणी केवळ महत्वाची बाब विचारात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे सदर मिळकतीमध्ये तोडणी योग्य झालेले

ऊस पिक त्वरित संबंधीत साखर कारखान्यास गाळपासाठी पाठवून ऊस पिकाचे नुकसान टाळणे. सदर ऊस पिकाचे गाळपातून येणा–या रकमेवर कोणत्या पक्षकाराचा हक्क आहे हे योग्य वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांती ठरणार आहेच. त्यामुळे याक्षणी दोन्ही पक्षकारांमधील वाद विचारात घेता कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करुन सदर मिळकतीमधील ऊस पिक गळीतासाठी संबंधीत साखर कारखान्यास पाठविणेचा आदेश पारित करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. काटेभोगाव, ता.पन्हाळा येथील शेतजमीन गट नं. ३१०, एकूण क्षेत्र ९ एकर २६ गुंठे या पैकी दक्षिणेकडील ३ एकर १७ गुंठे क्षेत्रातील उभे असलेल्या ऊस पिकाची तोडणी करुन ते श्री दत्त साखर कारखाना डालमिया भारत शुगर ॲन्ड इंडस्ट्रीज लि. आसुर्ले–पोर्ले, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचेकडे गळीतासाठी पाठविणेची कार्यवाही पूर्ण करणेकरीता ॲडव्होकेट श्री.ए.एन.नाईक यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२. कोर्ट कमिशनर यांनी कमिशनचे कामाची नोटीस दोन्ही पक्षकार व त्यांचे विधिज्ञांना समक्ष बजावणी करावी.

३. वि.प.क्रं. १–अ व ब यांनी कोर्ट कमिशनर यांचे देखरेखीखाली सदर मिळकतीमधील ऊस पिक

तोडणी प्रक्रिया योग्य त्या मनुष्यबळासह त्वरित पूर्ण करावी.

४. सदर तोडणी केलेला ऊस कोर्ट कमिशनर यांनी स्वतःचे नांवे संबंधीत साखर कारखान्यास गाळपासाठी पाठविण्याची कार्यवाही पूर्ण करुन तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा.

५. सदर मिळकतीमधील ऊस संबंधीत साखर कारखान्यास गाळपासाठी पाठविण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कोर्ट कमिशनर यांनी सदर ऊस बिलाच्या रकमेचा तपशील न्यायालयात सादर करुन ऊस बिलाची रक्कम कोणासही अदा न करता ती न्यायालयात जमा करण्याची लेखी सूचना संबंधीत साखर कारखान्यास दयावी.

६. वि.प.क्रं. १–अ व ब यांनी कोर्ट कमिशनर यांची फी रु.५०००/–त्वरीत न्यायालयात जमा करावी.

७. दोन्ही पक्षकारांनी कोर्ट कमिशनचे काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कोर्ट कमिशनर यांना योग्य ती मदत व सर्वतोपरी सहकार्य करावे.

Vinod Vilas Khulape

Digitally signed by Vinod Vilas Khulape
Date: 2022.03.21 17:47:51 +0530

( वि.वि.खुळपे )

कळे–खेरीवडे
दि.१९.०३.२०२२.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे–खेरीवडे.